युनिक वेचे

# त्यांच्यासाठी अश्रू ढाळू नका!

मोहम्मद
हनिफ






जेव्हा तुम्ही हे वाचत असाल, अंतिम शवयात्रा पूर्ण झाल्या असतील. प्राथमिक इयत्तांमधील मुलांसाठी छोट्या आकाराच्या शवपेट्या, मोठ्या इयत्तांमधील विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण आकाराच्या शवपेट्या.

कबरींवर पाणी शिंपडले जाईल, फुले रचली जातील. आयांचा गहिवर अनावर झालेला असेल. त्या आपल्या पाल्यांच्या तसबिरींची चुंबने घेत राहतील, अशी पाल्ये ज्यांना त्यांनी सकाळी शाळेत पाठवले, मुले ज्यांना हिरव्या रंगाचे कोट वा जर्सी घालून पाठवले, मुली ज्यांना हिरव्या चादरींमध्ये गुंडाळून शाळेत पाठवले अन् ज्यांना शाळेत सोडून पुरुषमंडळी घरी परतली होती.

जेव्हा हवेत बर्फमय गारठा वाढतो, तेव्हा आया एवीतेवी लहानग्यांच्या अभ्यासापेक्षा त्यांना होणाऱ्या सर्दीचीच जास्त काळजी करतात. कदाचित त्या या मुलांना शहीद (हुतात्मे) देखील म्हणत असतील. शहीद सरळ स्वर्गाला प्राप्त होतात/सरळ जन्नतला पोचतात अन् त्यामुळे आपण आपली समजूत घालू शकतो की पेशावरची थंडी त्यांना त्यांच्या कबरींमध्ये गाठणार नाही.

पेशावरमध्ये एक महत्त्वपूर्ण व तणतणणारी बैठक बोलावली जाईल, ज्याच्यात या हत्याकांडाचा निषेध अत्यंत कडक शब्दांत केला जाईल.

कदाचित तालिबानचे नाव घेतले जाईल किंवा त्यांचे वर्णन करण्यासाठी 'राष्ट्राचे/कौमचे दुश्मन' असे शब्द वापरले जातील व त्यांचा संपूर्ण खातमा करण्याच्या प्रतिज्ञा दोहरवल्या जातील. निश्चितच या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत, अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेतले जातील. अन् अर्थातच बैठक सुरू होण्यापूर्वी मृतांच्या/जन्नती गेलेल्या आत्म्यांसाठी दुवा केल्या जातील, प्रार्थना म्हटल्या जातील.

माझ्या मते या दुवा/प्रार्थनांची बिलकूल गरजच नाहीये.

मॅट्रिकच्या परीक्षेसाठी किंवा माध्यमिक किंवा प्राथमिक इयत्तांमध्ये शिकणाऱ्या या विद्यार्थ्यांचा असा काय तो कसूर, काय तो गुन्हा ज्याची माफी

मागण्यासाठी दुवा-प्रार्थना कराव्यात?

कदाचित कुणीतरी कँटिनवाल्याचे २० रुपये चुकवले असतील. कदाचित कुणीतरी वर्गमित्राला मदत करण्यासाठी कॉपी केली असेल. कदाचित कुणीतरी क्रिकेट मॅचमध्ये अम्पायर होता व त्याने मित्राला 'बाद' ठरवले नाही (मित्र बाद असताना). कदाचित कुणीतरी कुणाकडून तरी पैसे उसने घेतले व तसे केल्याचे नंतर कबूल करेना. कदाचित कुणीतरी वर्गात उठून उभा राहिला व त्याने शिक्षकाची नक्कल केली. कदाचित एखाद्या बदमाश मुलाने स्वतःला मोरीत कोंडून घेतले व आपल्या आयुष्यातील पहिली सिगरेट फुंकली.

मी बातम्यांमध्ये असेही ऐकले की जेव्हा हिरवे कोट, जर्सी व चादरी रक्ताने लालेलाल होत होत्या तेव्हा मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ सुरू होता. कदाचित तिथे कुणीतरी एखादे अनुचित गाणे गायला असेल.

पुढील आठवड्यापासून हिवाळ्याच्या सुट्ट्या सुरू होतील. कदाचित अनेक लहानग्यांनी त्यांच्या सुट्ट्या आपापल्या नातेवाईकांबरोबर गुजारायच्या ठरवल्या असतील. कदाचित त्यांनी चित्रपट बघत किंवा नेटवर चॅटिंग करत रात्री जागवण्याचे मनसुबे बनवले असतील.

खरंच एका सोळा वर्षीयाने असा काय गुन्हा केला असेल की ज्याच्यासाठी देशाच्या राजकीय व लष्करी नेतृत्वाने दुवा करण्यासाठी हात जुळवावेत?

कदाचित एका मित्राने दुसऱ्याला सुट्ट्यानंतर भेटायचे शपथपूर्वक कबूल केले असेल. आता त्यांच्यापैकी एकजण परतणार नाही कारण आता तो निपचित पडून आहे. एका अत्यंत थंड कबरीत पेशावरच्या मातीखाली. मागे उरला एक असा वर्ग ज्यात वर्गसखे नाहीत अन् जिथे घंटा शाळा संपल्याचे सांगण्यासाठी वाजणारच नाही.

म्हणून माझी पाकिस्तानच्या राजकीय व लष्करी नेतृत्वास कळकळीची विनंती आहे की, त्यांनी या मुलांच्या मृत्यूपश्चात गतीची, जिंदगीची फारशी काळजी करू नये. उद्या ते जेव्हा दुवा म्हणण्यासाठी प्रार्थना करण्यासाठी हात जुळवतील तेव्हा त्यांनी दुवा म्हणावी स्वतःच्याच सलामतीची अन् असे करताना आपले हात काळजीपूर्वक निरखून पाहावेत, पाहावे की हात सूर्ख लाल रक्ताने डागाळलेले तर नाहीत ना?

(लेखक पाकिस्तानी कादंबरीकार आहेत.)

●

**(अनु. विजय कुंजीर)**

---

**(शंदना मिनहास / पान १० वरून)**

या दिवसात दोन कथा माझ्याशी उच्चारवात बोलू पाहात आहेत. पहिली कथा, एका शिक्षिकेची. ती शिक्षिका अतिरेकी आणि तिच्या विद्यार्थ्यांमध्ये पहाडासारखी उभी राहिली. अतिरेक्यांनी जेव्हा तिला पेटवून दिलं तेव्हा त्याही अवस्थेत ती मुलांना पळून जाण्यासाठी ओरडत राहिली. दुसरी कथा, शाळेच्या मुख्याध्यापिकेची. सगळी मुलं सुरक्षितपणे निघत नाहीत तोवर शाळेबाहेर पडायला नकार देणारी ही मुख्याध्यापिका. हा तो साहसीपणा आहे जो कुठल्याही शस्त्राच्या, बाँबच्या अथवा भाषणबाजीच्या जोरावर उभा राहात नसतो. आणि हा साहसीपणा पाकिस्तानी लोकांना तरी अजिबात नवीन नाही, इतक्या स्पष्टपणे तो आपण अनेकदा पाहिलेला आहे. शवपेट्यांच्या बाजूला रांगेने उभ्या असलेल्या आणि आम्हाला 'बघताय काय, सामील व्हा' असं आवाहन करणाऱ्या हजारो लोकांमध्ये आपण तो पाहिला आहे. देशभरातल्या वाटा तुडवून रक्त नाही तर न्याय मागणाऱ्या बलुचि लोकांमध्ये पाहिलेला आहे. वेदनेला प्रेमाने उत्तर देणाऱ्या सोशिक अल्पसंख्याकांमध्ये पाहिलेला आहे. ऐतजाज हसनमध्ये पाहिलेला आहे. पाकिस्तानच्या नागरी समाजातील बळी गेलेले अगणित नायक आपल्या अखेरच्या क्षणापर्यंत काय विचार करत होते हे आपल्याला ठाऊक नाही. पण अशाच जीवघेण्या हल्ल्यातून वाचलेली आणि प्रभावीपणे बोलू शकणारी एक व्यक्ती आपल्याला माहीत आहे - मलाला युसुफझाई. २०१३ मध्ये तिनं आपल्याला सांगितलं होतं,

''अतिरेक्यांना वाटलं होतं की ते माझी उद्दिष्टं बदलू शकतील, माझ्या महत्त्वाकांक्षा दडपू शकतील. पण माझ्या आयुष्यात फारसं काही बदललं नाही, बदल झाला तो एकच- माझ्यातला दुबळेपणा, भीती, निराशा मरण पावली आणि शक्ती, ताकद आणि धैर्य जन्माला आलं.''

●

(द एक्सप्रेस ट्रिब्यून या पाकिस्तानी वर्तमानपत्रात २० डिसेंबर २०१४ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'होल्ड द लाईन' या इंग्रजी लेखाचा मराठी अनुवाद. प्रस्तुत लेखिका शंदना मिनहास यांची २००७ मध्ये 'टनेल व्हिजन' ही कादंबरी प्रसिद्ध झालेली असून पटकथालेखन, नाट्यलेखन, सदरलेखन आणि अभिनय अशा अनेक भूमिका त्या बजावत असतात. अनु. अभय कांता)